# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF /AZ//AUR/U/ 172 /2009 / 06/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Mohd. Azizullah Khan H.No.(Old) 2-1-95/4, New No.5-4-51, Quaziwada, Bhadkalgate Aurangabad ( Con.No.490010195338)

Dear Sir

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri** Mohd. Azizullah Khan H.No.(Old) 2-1-95/4, (New H.No.)No.5-4-51, Quaziwada, Bhadkalgate Aurangabad ( Con.No.490010195338)

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **27.01.2009 at 12.30 Hours .**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above
Shri Mohd. Azizullah Khan,
H.No.(Old) 2-1-95/4,( New H.No.5-4-51),
**Quaziwada, Bhadkalgate,**
**Aurangabad**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७२/२००९/०६**

**तक्रार दाखल दिनांक ;- १३/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- ०३/०३/२००९**

**श्री मोहम्मद अजीजउल्ला खान,**
**नविन घर क्रमांक ५-४-५१,**
**कॉझीवाडा,भडकलगेट, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०१९५३३८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडल, औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १३/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा वीज वापर नसतांना सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले व नंतर वीज बिल न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. अर्जदार हे वाणिज्य वापरासाठी वीज पुरवठ्याचा वापर करीत असल्याचे सांगत महावितरण कंपनीने त्यांना १०,०००/- रूपयाचे एस.एल.सी.चार्जेसची बिलात आकारणी केली. या चुकीच्या बिलाविरूध्द अर्जदाराने महावितरणच्या संबंधीत विभागाकडे वीज बिल दुरूस्त करून देण्याची विनंती केली पण त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २७/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री मोहम्मद अजीजउल्ला खान हजर होते. महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री राठौर तसेच लेखा विभागाचे श्री पत्तेवार हजर होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर मंचात जवाब दाखल केला. दिनांक ०२/१२/२००५ रोजी अर्जदाराच्या इथे करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात वीज पुरवठा करण्यात आलेल्या इमारतीमध्ये शाळा चालत असल्यामुळे त्यांना वाणिज्य वापराचे बिल देण्यात आले तसेच नियमानुसार १०,०००/- एस.एल.सी. चार्जेसची बिलात आकारणी करण्यात आली असल्याचे म्हटले आहे. स्थळ पाहणी करण्यात आलेल्यावेळी वीज पुरवठा चालु असल्याबदल

तसेच त्यावेळी अर्जदाराकडे असलेली थकबाकी याबाबत मंचाने विचारणा केली असता ही माहीती पुढील सुनावणीच्या वेळी देण्याचे नोडल अधिकारी यांनी मान्य केले. मंचाने पुढील सुनावणीची तारीख दिनांक ३१/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केली.

३) दिनांक ३१/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार हजर होते नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री डी.जे. माने सहाय्यक अभियंता उपस्थित होते त्यांनी सुनावणीची तारीख वाढविण्याची विनंती अर्ज मंचात दाखल केला मंचाने त्यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ०७/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०७/०२/२००९ रोजी घेण्यास आलेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला. व अर्जदारास ११८०/- रूपयाचे सुधारीत वीज बिल देण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेले सुधारीत वीज बिल मान्य नसल्याचे सांगत त्यांनी सरासरीवर वीज बिल भरलेले असुन महावितरणकडे नियमापेक्षा जास्त रक्कम भरली असल्याचे सांगितले. मंचाने याबाबतीत नोडल अधिकारी यांना खुलासा सादर करण्याचा आदेश देत पुढील सुनावणी १०/०२/२००९ रोजी ठेवली.

५) दिनांक १०/०२/२००९ घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी दुस-यांदा बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला व ४३०४ - ५६ रूपये क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे टेस्ट करण्याबाबत मंचाकडे परवानगी मागितली मंचाने अर्जदाराचे मीटर टेस्टींग करून दिनांक १६/०२/२००९ पर्यंत टेस्टींगचा अहवाल मंचात दाखल करण्याचे सांगत प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदाराने तसेच नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरून तसेच अर्जदाराच्या सी.पी.एल.चे अवलोकन केल्यावर असे आढळुन येते की,अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याच्याकडे बसविण्यात आलेल्या मीटर चा क्रमांक ००२५०२५० असा आहे. मार्च २००१ पासुन त्यांना सतत फॉल्टी,नार्मल, लॉक स्टेटस दाखवत सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात येत असल्याचे दिसुन येते.दिनांक ०२/१२/२००५ रोजी महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्य स्थळ पाहणी अहवालात विज पुरवठा एक ते दीड वर्षापासुन खंडित असल्याचे म्हटले आहे व जागेचा उपयोग शाळेसाठी करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. मंचाने विज पुरवठा नेमका कोणत्या तारखेस खंडित केला याबाबत महावितरणच्या नोडल अधिकारी यांना विचारले असता ते कोणताही खुलासा मंचात दाखल करू शकले नाही. अर्जदाराचा वीज पुरवठा कोणत्या तारखेस खंडित करण्यात आला याबाबत रेकार्ड उपलब्ध नसल्याचे संबंधित कनिष्ठ अभियंता यांचे पत्र त्यांनी मंचात दाखल केले. यावरून अर्जदाराच्या जागेचा शाळेसाठी वापर होत असतांना तेथे विज पुरवठा खंडित केलेला होता असा अनुमान काढता येतो. त्यामुळे महावितरण कंपनीतर्फे अर्जदार वीजेचा वाणिज्य वापरासाठी वापर करीत आहे म्हणुन एस.एल.सी. म्हणुन अर्जदारास बिलात आकारलेली १०,०००/- रक्कम ही चुकीची असल्याचे मंच आहे. नोडल अधिकारी यांनी दिनांक१०/०२/२००९ रोजी मंचात बिल रिव्हीजन प्रस्तावात (एस.एल.सी.रक्कम वगळता) वीज बिलात ४३०४-५६ रूपयाचे क्रेडीट देण्याचे मान्य केले आहे. सदरील प्रस्तावाचे निरिक्षण केल्यावर ते योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच याप्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण तर्फे अर्जदाराच्या बिलात आकारण्यात आलेले एस.एल.सी. चार्जेस रूपये १०,०००/-रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास सुधारीत बिल आकारतांना ४३०४-५६ रूपयाचे क्रेडीट द्यावे तसेच सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७२/२००९/०६** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री मोहम्मद अजीजउल्ला खान,**
**नविन घर क्रमांक ५-४-५१,**
**काझीवाडा,भडकलगेट, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७२/२००९/०६ )

आपण दिनांक १३/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**